# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २७७/२०२४ दिनांकः- २६/०७/२०२४.

## "६ वर्षांपासून फरार असलेला घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास भाईंदर पोलीस ठाणेकडून अटक"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अभिलेखावरील पाहिजे आरोपींवर अटक करुन कारवाई करणे बाबत मा. वरीष्ठांचे आदेश झालेले होते. त्याअनुषंगाने भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील जास्तीत-जास्त पाहिजे आरोपी यांना अटक करुन कारवाई करणे करीता गुन्हे प्रकटीकरण कक्षाने खास बातमीदार तयार करुन पाहिजे आरोपीचा शोध घेत असताना भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. १३७/२०१८ भा.द.वि.सं कलम ४५७, ३८०, ३४ प्रमाणे दाखल असून गुन्हयाची हकीगत अशी की, दिनांक २९/०३/१८ रोजी ०३.०० ते ०६.०६ वाजताचे सुमारास फिर्यादी हे आराम करीत असलेल्या रुम मध्ये आरोपीत हे फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने रुमचे खिडक्याचे ग्रील वाकवुन त्यावाटे आत प्रवेश करुन सुमारे ६५,०००/- रुपये किंमतीचे दोन मोबाईल, इतर वस्तु व रोख रक्कम घरफोडी करुन चोरुन नेले बाबत तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील गेल्या ६ वर्षांपासून फरार असलेला पाहिजे आरोपी याचा मोबाईल नंबर गोपनीय बातमीदारा मार्फत मिळवून त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता, आरोपी हा मुंबई परिसरात कधीतरी येत-जात असल्याचे निष्पन्न झाले. दि.२२/०७/२०२४ रोजी पाहिजे आरोपी नामे इब्राहिम दस्तगीर चौधरी, रा.रुम नं. १७ गल्ली नं. ५ शास्त्रीनगर, भाईंदर प. जि.ठाणे हा भाईंदर परिसरात असल्याचे खात्री लायक बातमी गोपनीय बातमीदारा मार्फत मिळाल्याने आरोपीचा ठावठिकाणा निष्पन्न करुन आरोपीतास शिताफिने ताब्यात घेऊन अटक करण्यात भाईंदर पोलीस गुन्हे प्रकटीकरण कक्षास यश आले आहे. तसेच सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असून यापुर्वी त्याचेवर भाईंदर पोलीस ठाणे गु.रजि.नं. २६८/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोउनि/प्रसाद गोवले हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवा, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्रीमती दिपाली खन्ना, सहा.पो.आयुक्त, भाईंदर विभाग, श्री.विवेक सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक

श्री माणिकराव कतुरे, पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा/रविंद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, के.पी. पवार, के.आर. पवार, सुशिल पवार, पोना/रामनाथ शिंदे, पोशि/संजय चव्हाण, सलमान पटवे, राहुल काटकर यांनी केलेली आहे.




--------oooo-------